मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल: vasaivirarcorporation@yahoo.com

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

जावक क्र. : व.वि.श.म/DAY NULM/232/2016-17
दिनांक : 27/12/2016

# जाहीर सूचना

केंद्र शासन पुरस्कृत दिनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील स्थिर व अस्थिर फेरीवाल्यांचे बायोमॅट्रिक पध्दतीने व GIS पध्दतीने सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. तसेच फेरीवाल्यांसाठी नगर पथ विक्रेता समिती गठीत करणे आवश्यक आहे. समिती अंतर्गत शहर फेरीवाला आराखडा विकसित करणे, फेरीवाल्यांचा पायाभूत सुविधांचा विकास करणे व त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांचा आर्थिक विकास करणे, विक्रीसाठी नागरी नियोजन करणे, फेरीवाल्यांना पत मिळविण्यासाठी समर्थ करणे, फेरीवाल्यांना बँकीग सेवा मिळविण्याच्या दृष्टिने प्रोत्साहन देणे तसेच खेळते भांडवल उपलब्ध करण्याच्या दृष्टिने संबंधिताना बँकेकडून क्रेडिट कार्ड उपलब्ध करण्याकरिता प्रयत्न करणे, तसेच इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देणे. वरील सर्व बाबींची पुर्तता करण्यासाठी नगर पथ विक्रेता समिती गठीत करण्यात येणार आहे.

त्यानुसार महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-अ, अन्वये नगरविकास विभाग, दि. ३ ऑगस्ट २०१६ च्या पथ विक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ नुसार महानगरपालिका क्षेत्रात फेरीवाल्यांसाठी नगर पथ विक्रेता समिती गठीत करण्यात येणार असून नगर पथ विक्रेता समितीच्या नामनिर्देशित सदस्यांसाठी किमान अर्हता पुढीलप्रमाणे असेल, त्यानुसार अर्ज मागविण्यात येत आहे.

**नगर पथ विक्रेता समितीच्या नामनिर्देशित सदस्यासाठीची किमान अर्हता -**

१) संघटनेची किंवा संघाची, नियम ११ च्या उप-नियम (४) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२) संघटना किंवा संघ, मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
३) संघटनेस किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे.
४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सिध्ददोषी असणार नाहीत.
५) संघटना किंवा संघ यांना, त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा.
६) एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास निवडणूक घेऊन समितीचे सदस्य निवडण्यात येतील.

**पुढील संवर्गातून नगर पथ विक्रेता समितीवर नामनिर्देशनासाठी इच्छूक व्यक्तींकडून अर्ज मागवित आहेत.**

१) अशासकीय संघटना
२) समुदाय आधारीत संघटना
३) निवासी कल्याण संघ
४) व्यापारी संघ
५) पणन संघ

**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

वसई-विरार शहर महानगरपालिका
प्रगतीचा प्रकाश हाच बहुजन विकास
स्थापना : ३ जुलै २००९

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल: vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./DAY NULM/232/2016-17
दिनांक : 27/12/2016.

| अ.क्र. | अशासकीय संघटना आणि इतर मंडळे | सदस्य संख्या |
|---|---|---|
| ख | इतर मंडळे | |
| | (एक) नगर पथ विक्रेते (यापैकी अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक आणि विकलांग व्यक्ती) यांच्या योग्य प्रतिनिधित्वासह एक तृतीयांश महिला विक्रेत्या असतील. | ०८ |
| | (दोन) अशासकीय संघटना आणि समुदाय आधारीत संघटना | ०२ |
| | (तीन) निवासी कल्याण संघ | ०२ |
| | (चार) व्यापारी संघाचा प्रतिनिधी | ०१ |
| | (पाच) पणन संघाचा प्रतिनिधी | ०१ |
| | (सहा) अग्रणी बँकेचा प्रतिनिधी | ०१ |

तरी पात्र संस्थेनी / व्यक्तींनी पुढील नमुन्यामध्ये **दि.** २८/१२/२०१६ **ते दि.** १३/१/२०१७ **या कालावधीत कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत** विहीत नमुन्यात आवश्यक सर्व कागद पत्रासह **वसई-विरार शहर महानगरपालिका, दिनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान कक्ष, प्रभाग समिती सी कार्यालय, पहिला माळा, विरार पूर्व** येथे सादर करावेत.

**टिप : १) विहीत अर्ज महापालिकेच्या संकेतस्थळावर <u>www.vvcmc.in</u> येथे उपलब्ध आहे.**
**२) मुदतीनंतर अर्ज स्विकारले जाणार नाही.**

सोबत :- नामनिर्देशन अर्ज

उपायुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका